पोलीस उप-आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय,

दिनांक २८/१०/२०२६

-:प्रेस नोट:-

मुंबईतील डोंगरी परिसरातुन 'हायड्रो गांजा' या अंमली पदार्थाची तस्करी करणारे दोन आरोपी जेरबंद.

अं.प.वि कक्ष गु.र.क्र व कलम	१०१/२०२६ कलम ८(क) सह २०(ब), २९ एन.डी.पी.एस कायदा १९८५
अटक दिनांक	दिनांक २८/१०/२०२६
गुन्ह्याचे घटनास्थळ	उमरखाडी क्रॉस लेन, डोंगरी, मुंबई ४००००९
आरोपी संख्या	एकुण ०२ आरोपी
जप्त अंमली पदार्थ व अंदाजे किंमत	एकुण ३ किलो ५६३ ग्रॅम वजनाचा **'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ जप्त मुददेमालाचे एकुण मुल्य (रू. १,२४,७०,५००/-)**

गुन्हे शाखेतील अं.प.वि कक्षाचे आझाद मैदान युनिटचे पथक दिनांक २८/१०/२०२६ रोजी डोंगरी परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाईकरिता गस्त करित असताना दोन इसम त्याचे हातातील निळया रंगाच्या दोन प्लॅस्टिक पिशवीमधील संशयास्पद वस्तुसह संशयास्पदरित्या वावरताना दिसुन आले. सदर इसमांच्या हालचाली या संशयास्पद असून त्यांच्या ताब्यात असलेल्या निळया रंगाच्या दोन्ही प्लॅस्टिक पिशवीमध्ये अंमली पदार्थ असल्याचा संशय असल्याने त्यांची झडती घेवुन सदर कारवाईमध्ये खालील वर्णनाचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

<u>हस्तगत मुददेमाल :-</u>

१) आरोपी क्र १ याचेकडुन एकुण १ किलो ८२३ ग्रॅम वजनाचा **'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ**

२) आरोपी क्र २ याचेकडुन एकुण १ किलो ७४० ग्रॅम वजनाचा **'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ**

एकुण ३ किलो ५६३ ग्रॅम वजनाचा 'हायड्रो गांजा' हा अंमली पदार्थ
जप्त मुददेमालाचे एकुण मुल्य (रू. १,२४,७०,५००/-)

नमुद इसमांविरोधात अं.प.वि कक्ष, आझाद मैदान युनिट, गु.र.क्र १०१/२०२६ कलम ८(क) सह २०(ब), २९ एन.डी.पी.एस कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करून नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई, श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई, श्रीमती. पोर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप-आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व श्री सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत आझाद मैदान युनिटचे प्र.पो.नि श्री. शैलेश सुर्यवंशी यांचे नेतृत्वात पोलीस उप-निरीक्षक, राम लिंगे, पोलीस उप-निरीक्षक सागर घाडगे, पो.ह पाटील, पो.ह प्रभु, पो.ह करांडे, पो.शि भोसले यांनी केली आहे.

----------oo----------